आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल ॲप!
ॲप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा!

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

**पान ३**

दिंड्यांची वर्दळ; टाळ-मृदंगाचा गजर

परिवहन आयुक्तांना वाहतूक सेनेचे निवेदन

**शेवटचे पान**

जिल्हा बँक उर्जितावस्थेत कधी येणार?

महाराष्ट्र, बडोदा संघ आमनेसामने

भारत-श्रीलंका आज आमनेसामने

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ । अंक १३९ । गुरुवार, दि. २३ जानेवारी २०२५ । पाने १२+८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## संपादकीय

### दुहेरी यश अभिमानास्पद!

भारताच्या खेळाडूंनी नुकताच दोनदा धमाका केला. भारताच्या पुरुष आणि महिला खेळाडूंच्या संघाने खो-खो खेळाच्या पहिल्याच विश्वचषकावर देशाचे नाव कोरले. या स्पर्धेत चोवीस देशांचे संघ सहभागी झाले होते. पंतप्रधानांपासून सर्वांनी विजयी संघांचे अभिनंदन केले. खो-खो हा देशातील आणि महाराष्ट्रातील पारंपरिक खेळ आहे, पण देशात काही विशिष्ट खेळांनाच प्रतिष्ठा आणि लोकाश्रय लाभला आहे. खो-खोसह अन्य काही खेळ त्या अर्थाने काहीसे दुर्लक्षित राहिले आहेत. वास्तविक कोणतेही मैदानी खेळ खेळण्यासाठी आणि त्यात अव्वल दर्जा मिळवण्यासाठी सारखेच परिश्रम करावे लागतात. आचार आणि विचारात खेळ नेहमीच प्रथम प्राधान्यावर ठेवावा लागतो. तरीही प्रतिष्ठेच्या बाबतीत नकळत भेदभाव आढळतो. असा खेळ करिअरसाठी निवडणे, सातत्याने खेळत राहणे आणि अव्वल दर्जा प्राप्त करणे हे दोन्ही संघांतील सर्व खेळाडूंसाठी सोपे नव्हतेच. त्यामुळे खो-खो किंवा बुद्धिबळ खेळातील असे लखलखीत विजय या खेळांकडे समाजाचे लक्ष वेधून घेतात. या खेळांमध्येही भवितव्य आहे, या खेळांनाही प्रतिष्ठा मिळू शकते, या धारणा मजबूत करतात. माध्यमांचेही लक्ष वेधून घेतात. अव्वल दर्जा गाठण्यासाठी सर्वांनाच घाम गाळावा लागतो. येथे पुरुष आणि महिला खेळाडू असा भेद नाही किंवा हे भेदाच्या दृष्टिकोनाचा पुरस्कार करणेही नाही, पण देशाच्या कानाकोपऱ्यातील मुलींना मुलांच्या तुलनेत अजूनही साधे खेळ खेळणेदेखील काहीसे दुरापास्तच आहे. खेळात अव्वल दर्जा गाठण्यासाठी सातत्य आणि समर्पण अत्यावश्यकच असते. ते मुलींसाठी तुलनेने थोडे कठीण असू शकते. कारण मुलींना वाढवताना समाज अजूनही पारंपरिक दृष्टिकोन अवलंबताना दिसतो. मुलींचे खेळही त्याला दुर्दैवाने अपवाद नाहीत. परिणामी थोड्या मोठ्या वयाच्या मुलींनी वेगळी वाट चोखाळू नये, अशीच बहुसंख्य पालकांची अपेक्षा असते. या पार्श्वभूमीवर मुलींनी तो खेळ निवडला, त्यात विशेष प्राविण्य मिळवले. मात्र त्यासाठी त्यांना स्वतःच्या, पालकांच्या आणि समाजाच्या धारणांशी संघर्ष करावा लागला असेल. भारताच्या महिला संघाची कर्णधार प्रियंका इंगळे ही बीड जिल्ह्यात केज तालुक्यातील कळम आंबा गावची कन्या आहे. अश्विनी शिंदे मोहोळ तालुक्यातील खंडोबाची वाडीची, रेशमा राठोड बदलापूरची, वैष्णवी पवार कोल्हापूर करंजीवणे तालुक्यातील कागलची! या काही खेळाडूंच्या गावांचा उल्लेख एवढ्यासाठीच की, त्यांचा विश्वचषक संघापर्यंत पोहोचायचा प्रवास किती खाचखळग्यांचा होता ते दर्शवतो. प्रत्येक खेळातील अशा सर्वच खेळाडू मुलींचे खेळणे स्वीकारार्ह बनवतात. त्यांची खेळण्याची वाट प्रशस्त करतात. प्रतिकूलतेला दोष देण्यापेक्षा ध्येयावर लक्ष केंद्रित केले आणि प्रयत्नात सातत्य राखले तर कोणत्याही क्षेत्रात अत्युच्च टोक गाठणे अशक्य नाही, हाच संदेश देतात. दोन्ही विजेत्या संघांचे अभिनंदन!



# १२ प्रवाशांना रेल्वेने चिरडले

## आगीच्या अफवेने घेतल्या उड्या अन् गाठले मृत्यूचे दार



### मृतांच्या वारसांना पाच लाख रुपये

जळगाव जिल्ह्यातील पाचोरानजीक एका अत्यंत दुर्दैवी घटनेत काही लोकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय वेदनादायी आहे. या अपघातातील मृतांच्या वारसांना राज्य सरकारकडून पाच लाख रुपयांची मदत देण्यात येणार असून, जखमींवर पूर्णपणे मोफत उपचार देण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोस येथून केली. संपूर्ण स्थितीवर आम्ही लक्ष ठेऊन असून, आवश्यक ती सर्व मदत तातडीने पुरविण्यात येत आहे. मी जिल्हा प्रशासनाच्या संपर्कात असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही रेल्वे अपघात दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केले आहे. अपघाताची घटना कळताच अजित पवार यांनी तातडीने जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधून अपघाताची माहिती घेतली तसेच, जखमी प्रवाशांना तातडीची मदत आणि मोफत वैद्यकीय उपचारांची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले.



**पाचोरा/जळगाव । प्रतिनिधी**

मुंबईला जाणाऱ्या पुष्पक एक्स्प्रेसला आग लागल्याच्या अफवेने काही प्रवाशांनी गाडीतून उड्या मारल्या. मात्र, समोरुन येणाऱ्या कर्नाटक एक्स्प्रेसने त्यांना चिरडल्याची घटना घडली. हा दुर्दैवी अपघात जळगावमधील परधाडे स्टेशनजवळ सायंकाळी ५ च्या सुमारास घडला. या अपघातात १२ प्रवाशांचा मृत्यू झाला तर ४० हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. या ठिकाणी बचावकार्य सुरू करण्यात आले असून, जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

परधाडे रेल्वे स्टेशननजिक पुष्पक एक्स्प्रेसच्या मोटरमनने ब्रेक दाबल्याने एक्स्प्रेसच्या चाकांमधून आगीच्या ठिगण्या उडाल्या. त्यामुळे प्रवाशांमध्ये एक्स्प्रेसला आग लागल्याची अफवा पसरली. या अफवेमुळे बायका-मुलांमध्ये एकच गोंधळ उडाला. एक्स्प्रेसमधील लोक हादरून गेले. आवाज आणि किंकाळ्या सुरू झाल्या. या अफवेने घाबरलेल्या ३५ ते ४० प्रवाशांनी एक्स्प्रेसमधून पटापट उड्या मारल्या. समोरून गाडी येते की नाही याची खातरजमाही त्यांनी केली नाही. ते सर्वजण गाडी सुरु होण्याची वाट पाहत ट्रॅकवर बसले होते. त्याचवेळी दुसऱ्या दिशेने येणाऱ्या भरधाव कर्नाटक एक्स्प्रेसने अनेकांना चिरडले.या अपघातातील मृत १२ प्रवाशांमध्ये ८ पुरुष, एक १० वर्षीय बालक आणि तीन महिलांचा समावेश आहे. सर्वच मृतदेह शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आणले आहेत. आतापर्यंत पाच मृतांची ओळख पटली आहे. मध्य रेल्वेच्या जनसंपर्क अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, पुष्पक एक्स्प्रेस जळगावमधून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे निघाली होती. परधाडे स्थानकाआधी ट्रेन थांबली होती. यावेळी काही प्रवासी खाली उतरले. त्यावेळी भुसावळकडे जाणाऱ्या कर्नाटक एक्स्प्रेसने धडक दिली. यामुळे हा अपघात झाला आहे. भुसावळमधून वैद्यकीय मदत पाठवण्यात आली आहे. तसेच स्थानिक प्रशासनालाही कळवण्यात आले आहे.

### मंत्र्यांचा ताफा घटनास्थळी

घटनेची माहिती मिळताच आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन, पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील, खा. स्मिता वाघ यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी घटनास्थळी दाखल झाले. केंद्रीय युवा व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसेंनी अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली, तर जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक व भुसावळ येथून रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी तत्काळ अपघातग्रस्त ठिकाणी पोहोचले व मदतकार्यास वेग आला.

### चार ठिकाणी नियंत्रण कक्ष

जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयातील ०२५७-२२१७१९३ या क्रमांकावर हेल्पलाईन सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव, पाचोरा, भडगाव आणि भुसावळ तहसीलदार कार्यालयात नियंत्रण कक्ष तातडीने कार्यान्वीत करण्यात आले आहेत.





◉ अयोध्यातील मंदिरात श्री रामलल्ला मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या वर्षपूर्तीनिमित्ताने शिवसेनेच्या वतीने नाशिक शहरात बुधवारी श्रीराम उत्सव साजरा करण्यात आला. त्यानिमित्त श्री काळाराम मंदिरात महाआरती करण्यात आली. (बातमी पान १० वर)

# १५.७० लाख कोटींची गुंतवणूक

## दावोसमध्ये सर्वाधिक ५४ सामंजस्य करार

**दावोस । वृत्तसंस्था**

दावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये इतिहास घडला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वात महाराष्ट्राने आजच्या दुसऱ्या दिवशीपर्यंत १५.७० लाख कोटी गुंतवणुकीच्या एकूण ५४ सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या आहेत. यातून १५.९५ लाख रोजगारनिर्मिती होईल.

आजच्या सामंजस्य करारांपैकी सर्वांत मोठ्या गुंतवणुकीचा करार हा रिलायन्स समूहाचा असून, पेट्रोकेमिकल्स, पॉलिस्टर, नवीनीकरणीय ऊर्जा, बायोएनर्जी, हरित हायड्रोजन, ग्रीन केमिकल्स, औद्योगिक क्षेत्रविकास, रिटेल, डेटा सेंटर्स, टेलिकम्युनिकेशन्स, आदरातिथ्य आणि




रिअर इस्टेट या क्षेत्रात ते ३,०५,००० कोटी इतकी गुंतवणूक करणार आहेत. या एका करारातून ३ लाख रोजगार निर्मितीचा अंदाज आहे. रिलायन्स समूहासोबत ३ लाख ५ हजार कोटींचा सामंजस्य करार करण्यात आला असून, यातील बहुसंख्य गुंतवणूक ही सेवा क्षेत्रात होणार असल्याने सुमारे ३ लाख

पान १० वर

# शिवसेनेच्या दोन्ही गटांचे आज शक्तिप्रदर्शन

## मेळाव्यातून स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे रणशिंग फुंकणार

**मुंबई । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीतील जय-पराजयाचे कवित्व बाजूला सारत शिवसेनेच्या उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे गटाने आता स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचे निमित्त साधत दोन्ही गट आज, गुरुवारी मुंबईत जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यासाठी सज्ज झाले आहेत. शिवसेना उद्धव ठाकरे गटाचा आज अंधेरीतील छत्रपती शिवाजी महाराज स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे तर एकनाथ शिंदे गटाचा वांद्रे-कुर्ला संकुलात मेळावा होत आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून दोन्ही गटाकडून स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे रणशिंग फुंकले जाणार आहे.

पान १० वर

### ठाकरेंच्या भूमिकेकडे लक्ष

शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी मध्यंतरी मुंबईपासून नागपूरपर्यंतच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढण्याचे जाहीर केले होते. मात्र, खुद्द उद्धव ठाकरे यांनी अद्याप महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद निवडणुकीबाबत भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे आजच्या मेळाव्यात उद्धव ठाकरे विधानसभा निवडणूक निकाल आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक विशेषतः मुंबई महापालिका निवडणुकीच्या संदर्भात कोणती भूमिका मांडणार, याकडे शिवसैनिकांचे लक्ष लागले आहे.

### बाळासाहेबांच्या जयंतीनिमित्त शिवोत्सव

विधानसभा निवडणुकीतील दणदणीत विजयाने आत्मविश्वास दुणावलेल्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आता स्थानिक निवडणुकांवर लक्ष केंद्रित केले आहे. त्यासाठी शिंदे गटाच्यावतीने आज बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचे औचित्य साधत शिवोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. वांद्रे-कुर्ला संकुलात होणाऱ्या या कार्यक्रमात शिंदे हे उद्धव ठाकरे गटाला लक्ष्य करण्याची शक्यता आहे. शिंदे गट स्थानिक निवडणुका विशेषतः मुंबई महापालिकेची निवडणूक महायुती म्हणून लढवण्याची शक्यता असली तरी एकनाथ शिंदे आपल्या कार्यकर्त्यांना स्थानिक निवडणुका स्वबळावर लढण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन करू शकतात.

